गोपनीय/अतितात्काळ

क्र. पोमसं/२/१०(५)/बदल्या/२४/२०१६.
**महाराष्ट्र राज्य पोलीस मुख्यालय,**
**शहीद भगतसिंह मार्ग, कुलाबा,**
**मुंबई- ४०० ००१.**
दिनांक :- ०६ /०१/२०१७.

**संदर्भ** :- शासन आदेश, गृहविभाग, १) क्र. रापोसे-१७१६/प्र. क्र. ३०४/पोल-१ (अ), दि.२९/११/२०१६, व
२) क्र. रापोसे-०११६/प्र. क्र. १८९(१)/पोल-१ अ, दि. ३०/१२/२०१६.

**विषय** :- पोलीस उप अधीक्षक / सहायक पोलीस आयुक्त (नि:शस्त्र) संवर्गातील अधिकाऱ्यांच्या बदलीबाबतचे शासन आदेश.

* * * * * *

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने महाराष्ट्र अध्यादेश क्र. ३, दिनांक ०१ फेब्रुवारी, २०१४ मधील कलम २२ (न) (२) मधील तरतुदींच्या अनुषंगाने, संदर्भाधिन शासन आदेशांन्वये पोलीस उपअधीक्षक /सहायक पोलीस आयुक्त (नि:शस्त्र) संवर्गातील खालील नमूद अधिकाऱ्यांच्या बदल्या नियुक्ती शासनाने आदेशित केल्या आहेत :-

| अ. क्र. | पोलीस उप अधीक्षकांचे नांव | सध्याच्या नियुक्तीचे ठिकाण | नवीन नियुक्तीचे ठिकाण |
|---|---|---|---|
| १. | श्री. अमोल भाऊसाहेब झेंडे | उपविभागीय पोलीस अधिकारी, रोहा उपविभाग, जि. रायगड | सहायक पोलीस आयुक्त, नवी मुंबई |
| २. | श्री. ए. आर. आम्ले | पोलीस उपअधीक्षक, नागरी हक्क संरक्षण, नांदेड | पोलीस उपअधीक्षक, दक्षता विभाग, समाजकल्याण विभाग, औरंगाबाद |

२. घटक प्रमुखांना विनंती करण्यात येते की,

अ. संदर्भाधिन शासन आदेशांच्या अनुषंगाने उचित कार्यवाही तात्काळ करण्यात यावी, व तसा अनुपालन अहवाल सत्वर या कार्यालयास सादर करावा.

आ. बदलीवरील नवीन नियुक्तीच्या ठिकाणांसंदर्भात मा. न्यायालयाचे, अथवा मा. न्यायाधिकरणाचे स्थगिती आदेश असल्यास, ते विचारात घेऊन पुढील कार्यवाही करावी.

इ. सदर आदेशांची प्रत, तसेच बदलीवरील नवीन नियुक्तीच्या ठिकाणी कार्यमुक्त करण्याबाबतच्या आदेशांची प्रत संबंधीत अधिकाऱ्यांना व्यक्तीश: अदा करुन ती त्यांना प्राप्त झाल्याबाबत त्यांची दिनांकासहित स्वाक्षरी घ्यावी, व ती पोच या कार्यालयास पाठवावी. तसेच, वरील अधिकाऱ्यांना कोणत्याही प्रकारची रजा मंजूर करण्यात येऊ नये.

ई. सदर बदलीच्या आदेशांमुळे ज्या जागा रिक्त होणार आहेत, त्या ठिकाणांचा कार्यभार संबंधीत घटक प्रमुखांनी घटकातील इतर पोलीस अधिकाऱ्यांकडे सोपवावा.

उ. उपरोक्त आदेशांच्या अनुषंगाने संबंधीत अधिकाऱ्यांना बदलीवर **विनाविलंब कार्यमुक्त** करुन त्यांनी त्यांच्या नवीन नियुक्तीच्या पदावर तातडीने हजर होण्याच्या दृष्टीने आवश्यक ती कार्यवाही करुन अनुपालन अहवाल या कार्यालयास सादर करावा.

३. उपरोक्त आदेशांच्या अनुषंगाने संबंधीत अधिकाऱ्यांना त्यांच्या बदलीवरील नवीन नियुक्तीच्या ठिकाणी कार्यमुक्त केल्याची, तसेच ते नवीन नियुक्तीच्या ठिकाणी रुजू झाल्याची तारीख कृपया तातडीने या कार्यालयास कळवावी. तसेच, ते जर बदलीवर नवीन नियुक्तीच्या ठिकाणी हजर झाले नाहीत तर तसे या कार्यालयास कळवावे, आणि त्यांच्याविरुध्द या कार्यालयाचे क्र. २/५५०७, दिनांक १६/०९/१९८३, ११/०१/१९८४, व दि. १०/०२/१९९१ तसेच क्र. पोमसं/३/५५०७/६/९७, दि.१३/०२/१९९७ च्या परिपत्रकातील सूचनांप्रमाणे आवश्यक ती कार्यवाही करावी.

(राजकुमार व्हटकर)
विशेष पोलीस महानिरीक्षक (आस्थापना)
पोलीस महासंचालक यांचेकरिता.

प्रति,

विशेष पोलीस महानिरीक्षक, कोंकण परिक्षेत्र, नवी मुंबई / नागरी हक्क संरक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
आयुक्त, समाज कल्याण, महाराष्ट्र राज्य, पुणे-१. (सस्नेह)
पोलीस आयुक्त, नवी मुंबई.
उपसंचालक, विभागीय जाती पडताळणी समिती, औरंगाबाद.
पोलीस अधीक्षक, रायगड-अलिबाग.

प्रत सविनय सादर :-

अपर मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन, गृह विभाग, दुसरा मजला, मंत्रालय, हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई
( **लक्षवेध :- श्री. प्र. मो बलकवडे,** कक्ष अधिकारी)

प्रत सस्नेह :-

महालेखाकार-१ (लेखा व अनुज्ञेयता) / महालेखाकार-२ (लेखा परिक्षा), महाराष्ट्र राज्य, मुंबई/नागपूर
अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई.

प्रत :-

जिल्हा कोषागार अधिकारी, सातारा / कोल्हापूर.
पोलीस अधीक्षक, राज्य पोलीस नियंत्रण कक्ष, मुंबई.
कार्यासन अधिकारी, का. क्र. २-अ, ९, ३६ व ४०.
**पोलीस उपअधीक्षक, संगणक कक्ष**

२. प्रस्तुत बदलीचे आदेश **"पोलीस उपअधीक्षकांच्या बदल्या"** या शिर्षाखाली महाराष्ट्र पोलीस दलाच्या संकेत स्थळावर पुढील पंधरा दिवसांसाठी प्रसिध्द करावे.